Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक १] गुरुवार, जानेवारी २०, २०२२/पौष ३०, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १.

जिल्हाधिकारी, यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक उपजि-भूसं-रप्र-कलि-कावि-३४-२०२२.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक प्र.अ.-भूसं-रप्र-कलि-कावि-६७४-२०२१, दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची - एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची गरज भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ, जिल्हा यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०४-४७-२०२०-२१, गाव धानोरा, ता. यवतमाळ, जिल्हा यवतमाळ

अ. क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	संपादित अंदाजित क्षेत्र
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	९	० ०९
२	८/१	० ४४
३	७	० १९
	एकूण . .	० ७२

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:—	वर्धा-नांदेड, मार्गे यवतमाळ-पुसद नवीन रेल्वे लाईन करीता.
प्रकल्प कार्याचे वर्णन	:—	वर्धा-नांदेड, मार्गे यवतमाळ-पुसद नवीन रेल्वे लाईनचे सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ.
समाजाला मिळणारे लाभ	:—	सार्वजनिक हितार्थ.

अनुसूची-तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

- निरंक -

टीप :— उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

अमोल येडगे,
जिल्हाधिकारी,
यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक १२ जानेवारी २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.